# १. मुंबई पोलीस कायदा १९५१

## विश्लेषण

**प्र.1. पोलीसांना काही ठिकाणांवर मुक्त प्रवेशाचा अधिकार आहे अशी ठिकाणे म्हणजे : (PSI 2019)**

a) मनोरंजनाचे ठिकाण b) जमावाची जागा
c) सभेचे ठिकाण

वरीलपैकी कोणती बरोबर आहे/त ?

1) फक्त (a) 2) फक्त (c)
3) दोन्ही (a) आणि (c) 4) सर्व (a), (b), (c)

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** योग्य पर्याय : 4

■ महाराष्ट्र पोलीस अधिनियम, 1951

कलम 41 : मनोरंजनाची स्थाने व जाहीर सभा यांतील अव्यवस्था टाळण्यासाठी पोलीसांनी बंदोबस्त करणे.

1) पोलीस लोकांना निर्देश देऊ शकतात, त्याचे पालन करणे सर्व व्यक्तींवर बंधनकारक असेल.
2) त्या जागी व त्या सभेत येण्या-जाण्याचे पोलीसांना पूर्ण स्वातंत्र्य असते.

**प्र.2. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, 1951 मधील अपराध व शिक्षांच्या अनुषंगाने जोड्या लावा. (PSI -2019)**

| कलम | तरतूद |
|---|---|
| अ) 108 | i) सार्वजनिक विहीरी वगैरेमधील पाणी दूषित करणे. |
| ब) 105 | ii) लोकांसमोर असभ्य वर्तन करणे. |
| क) 110 | iii) रस्त्यावर किंवा रस्त्याजवळ किंवा सार्वजनिक जागी किंवा त्या जागेजवळ क्षोभक कृत्य करणे. |
| ड) 123 | iv) शांततेचा भंग व्हावा या उद्देशाने गैरवर्तन करणे. |

पर्यायी उत्तरे :

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | i | ii | iii | iv |
| 2) | ii | i | iv | iii |
| 3) | iii | iv | ii | i |
| 4) | iv | iii | i | ii |

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** योग्य पर्याय : 1

■ मुंबई पोलिस अधिनियम 1951

| | | |
|---|---|---|
| 1) | कलम 108 | सार्वजनिक विहीरी, तळे, नदी, नाला, ओढे इत्यादी मधील पाणी दूषित करणे. |
| 2) | कलम 110 | लोकांसमोर असभ्य वर्तन करणे. |
| 3) | कलम 122 | सूर्यास्त व सूर्योदय यांच्या दरम्यान संशयास्पद स्थितीत सापडणे. |
| 4) | कलम 112 | शांततेचा भंग व्हावा या उद्देशाने गैरवर्तन करणे. शिक्षा : 1 महिना ते 1 वर्ष कारावास आणि ₹1,000/-पर्यंत द्रव्यदंड. |
| 5) | कलम 123 | प्राधिकारावाचून शस्त्र बाळगणे. |

**प्र.3. खालीलपैकी कोणते विधान/ने चूक आहे/त ? (PSI 2019)**

a) पोलीस अधिकाऱ्याला निलंबित केल्यास त्याचे सर्व अधिकार व कार्य देखील निलंबित होतात.
b) निलंबित पोलीस अधिकारी त्याच्या सर्व विशेषाधिकारां-पासून वंचित केला जात नाही.
c) निलंबित पोलीस अधिकारी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अधीन असतो.

पर्यायी उत्तरे :
1) फक्त (b)
2) फक्त (c)
3) फक्त (a) आणि (c)
4) वरीलपैकी कोणतेही नाही.

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** **योग्य पर्याय : 1**

- महाराष्ट्र पोलीस अधिनियम, 1951
- कलम 15 : पोलीस अधिकाऱ्यास निलंबित केल्यास होणारा परिणाम.
  1) त्याची कार्ये, अधिकार व विशेष अधिकार निलंबित राहतात.
  2) परंतु तो पोलीस अधिकारी असण्याचे बंद होत नाही व तो पोलीस अधिकारी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अधीन राहतो.

**प्र.4. महाराष्ट्र पोलिस अधिनियम, 1951 मधील कलम 2(4) मधील व्याख्येच्या अनुषंगाने योग्य पर्याय निवडा.** **(PSI -2019)**

1) पोलीस शिपाई 2) आयुक्त
3) अधीक्षक 4) उप आयुक्त

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** **योग्य पर्याय : 1**

- महाराष्ट्र पोलीस अधिनियम, 1951
- कलम 2(4) : 'पोलीस शिपाई'
- म्हणजे पोलीस खात्यातील सर्वात कनिष्ठ दर्जाचा पोलीस अधिकारी.

**प्र.5. खालीलपैकी कोणते विधान/विधाने बरोबर आहे/त ?** **(PSI 2019)**

a) एखाद्या व्यक्तीला किंवा घोड्यांना इशारा देण्याकरीता पतंग उडवता येते.
b) सार्वजनिक ठिकाणी कोणत्याही व्यक्तीला उपद्रव निर्माण करता येणार नाही.
c) पोलीस ठाणे किंवा न्यायालय येथे व्यक्तीला धुम्रपान व थुंकता येणार नाही.

पर्यायी उत्तरे :
1) फक्त (a) 2) फक्त (b)
3) फक्त (b) आणि (c) 4) सर्व (a), (b), (c)

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** **योग्य पर्याय : 3**

- महाराष्ट्र पोलीस अधिनियम, 1951
- कलम 113 : व्यक्ती, घोडे, मालमत्ता यास धोका, इजा, धास्ती होईल अशाप्रकारे पतंग उडवू नये.
- कलम 115 : रस्त्यात/रस्त्याजवळ, सार्वजनिक जागा, लोकांच्या येण्या-जाण्याच्या ठिकाणी उपद्रव करणे.
- कलम 116 : सार्वजनिक इमारतीमधील नोटीशीकडे दुर्लक्ष करून तंबाखू खाणे, धुम्रपान करणे, थुंकणे.
- कलम 117 : कलम 99 ते कलम 116 नुसार अपराध करणाऱ्यास.
- शिक्षा : ₹1,200/- पर्यंत.

**प्र.6. महाराष्ट्र पोलिस अधिनियम, 1951 मधील कलम 14(1) अन्वये (निरीक्षकाच्या श्रेणीच्या किंवा त्याहून कमी श्रेणीच्या) प्रत्येक पोलीस अधिकाऱ्यास, त्याची नेमणूक झाल्यानंतर अनुसूची ............... मध्ये तरतूद केलेल्या नमुन्याप्रमाणे एक प्रमाणपत्र देण्यात येईल.** **(PSI -2019)**

1) IV 2) II
3) I 4) III

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** **योग्य पर्याय : 2**

- महाराष्ट्र पोलीस अधिनियम, 1951
- कलम 14 : 'नेमणुकीचे प्रमाणपत्र'
- पोलीस निरीक्षक किंवा त्याहून कमी श्रेणीच्या प्रत्येक पोलीस अधिकाऱ्यास, त्याची नेमणूक झाल्यानंतर अनुसूची-II मध्ये तरतूद केलेल्या नमुन्याप्रमाणे एक प्रमाणपत्र देण्यात येईल.
- सेवेत नसल्यास ते प्रमाणपत्र रद्द होते. निलंबित केले असल्यास अंमलात नसते.

**प्र.7. खालीलपैकी कोणत्या बाबींच्या संदर्भात दंडाधिकारी अधीक्षकांकडून अहवाल मागवू शकतात ?** **(PSI 2019)**

a) सराईत गुन्हेगारांचा प्रतिबंध.
b) जमावाचे नियमन.
c) मनोरंजनाचे नियमन.

पर्यायी उत्तरे :
1) फक्त (a) 2) फक्त (a) आणि (b)
3) फक्त (b) आणि (c) 4) सर्व (a), (b), (c)

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** **योग्य पर्याय : 4**

■ महाराष्ट्र पोलीस अधिनियम, 1951

- कलम 18 : अधीक्षकाकडून प्रतिवृत्त/अहवाल मागविण्याचा जिल्हा दंडाधिकाऱ्यांना अधिकार असतो.
- पुढील बाबींच्या संदर्भात दंडाधिकारी अधीक्षकांकडून अहवाल मागवू शकतात.

1) सराईत गुन्हेगारांचा प्रतिबंध
2) जमावाचे नियमन.
3) मनोरंजनाचे नियमन.
4) गुन्हे
5) शांतताभंग होऊ न देणे.
6) पोलीस बलाची विभागणी करणे.
7) अधीक्षकाच्या हाताखालील कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याची वर्तणूक व चारित्र्य.
8) इतर साह्यकारी साधनांचा उपयोग.
9) पोलीस बलावरील आपले नियंत्रण व सुव्यवस्था राखणाऱ्या साधनांचा उपयोग.

**प्र.8. पोलीसांच्या खालीलपैकी कोणत्या कृतीला तापदायक कृती म्हणतात ? (PSI 2019)**

a) योग्य कारणांशिवाय एखाद्या ठिकाणी प्रवेश करणे.
b) संपत्तीचा अनावश्यक ताबा मिळवणे.
c) ताब्यातील व्यक्तीचा वैयक्तिक छळ करणे.

पर्यायी उत्तरे :
1) फक्त (b) 2) फक्त (c)
3) फक्त (b) आणि (c) 4) सर्व (a), (b), (c)

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** — **योग्य पर्याय : 4**

■ महाराष्ट्र पोलीस अधिनियम, 1951

- कलम 147 : पोलीस अधिकाऱ्याने तापदायक रितीने प्रवेश करणे, झडती घेणे, अटक करणे.

1) योग्य कारणांशिवाय एखाद्या ठिकाणी प्रवेश करणे.
2) मालमत्ता/संपत्ती त्रासदायक रितीने व विनाकारण जप्त करणे.
3) ताब्यातील व्यक्तीचा वैयक्तिक छळ करणे.
4) कायद्याने अधिकार नसताना धमकी/आश्वासन.

- शिक्षा : 6 महिन्यांपर्यंत कारावास/₹500/- पर्यंत दंड अथवा दोन्ही.

**प्र.9. पोलीसांना काही ठिकाणांवर मुक्त प्रवेशाचा अधिकार आहे अशी ठिकाणे म्हणजे : (PSI 2019)**

a) मनोरंजनाचे ठिकाण
b) जमावाची जागा
c) सभेचे ठिकाण

वरीलपैकी कोणती बरोबर आहे/त ?
1) फक्त (a) 2) फक्त (c)
3) दोन्ही (a) आणि (c) 4) सर्व (a), (b), (c)

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** — **योग्य पर्याय : 4**

■ महाराष्ट्र पोलीस अधिनियम, 1951

■ कलम 41 : मनोरंजनाची स्थाने व जाहीर सभा यांतील अव्यवस्था टाळण्यासाठी पोलीसांनी बंदोबस्त करणे.

1) पोलीस लोकांना निर्देश देऊ शकतात, त्याचे पालन करणे सर्व व्यक्तींवर बंधनकारक असेल.
2) त्या जागी व त्या सभेत येण्या-जाण्याचे पोलीसांना पूर्ण स्वातंत्र्य असते.

**प्र.10. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, 1951 मधील अपराध व शिक्षांच्या अनुषंगाने जोड्या लावा. (PSI -2019)**

| कलम | तरतूद |
|---|---|
| अ) 108 | i) सार्वजनिक विहीरी वगैरेमधील पाणी दूषित करणे. |
| ब) 105 | ii) लोकांसमोर असभ्य वर्तन करणे. |
| क) 110 | iii) रस्त्यावर किंवा रस्त्याजवळ किंवा सार्वजनिक जागी किंवा त्या जागेजवळ क्षोभक कृत्य करणे. |
| ड) 123 | iv) शांततेचा भंग व्हावा या उद्देशाने गैरवर्तन करणे. |

पर्यायी उत्तरे :

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | i | ii | iii | iv |
| 2) | ii | i | iv | iii |
| 3) | iii | iv | ii | i |
| 4) | iv | iii | i | ii |

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** — **योग्य पर्याय : 1**

■ मुंबई पोलिस अधिनियम 1951

| | |
|---|---|
| 1) कलम 108 | सार्वजनिक विहीरी, तळे, नदी, नाला, ओढे इत्यादी |

| | |
|---|---|
| | मधील पाणी दूषित करणे. |
| 2) कलम 110 | लोकांसमोर असभ्य वर्तन करणे. |
| 3) कलम 122 | सूर्यास्त व सूर्योदय यांच्या दरम्यान संशयास्पद स्थितीत सापडणे. |
| 4) कलम 112 | शांततेचा भंग व्हावा या उद्देशाने गैरवर्तन करणे. शिक्षा : 1 महिना ते 1 वर्ष कारावास आणि ₹1,000/- पर्यंत द्रव्यदंड. |
| 5) कलम 123 | प्राधिकारावाचून शस्त्र बाळगणे. |

**प्र.11. महाराष्ट्र पोलिस अधिनियम, 1951 मधील कलम 80(1) अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याने याबाबतीत विशेषरित्या कामावर नेमलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास, ............... मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या एखाद्या अपराधाबद्दल अधिपत्राशिवाय अटक करता येईल. (PSI -2018)**

1) कलम 98
2) कलम 110
3) कलम 82
4) कलम 86

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** — **योग्य पर्याय : 2**

- महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम 1951
  1) कलम 110 (असभ्य वर्तन करणे) अपराधाकरीता वारंटाशिवाय अटक करता येते.
  2) कलम 120 (जाणूनबुजून अतिक्रमण) मधील अपराध करणाऱ्या व्यक्तीला वारंटशिवाय अटक करता येते.

**प्र.12. महाराष्ट्र पोलिस अधिनियम, 1951 च्या अंतर्गत नाशिक येथील पोलीस प्रशिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून राज्य सरकारला कोणाची नेमणूक करता येते ? (PSI -2018)**

1) कोणताही पोलीस अधिकारी
2) ज्यांनी इतर कोणत्याही कॉलेजचे प्राचार्य म्हणून काम पाहिले आहे अशी व्यक्ती.
3) पोलीस अधिक्षक दर्जाहून कमी दर्जाचा नसेल असा कोणताही पोलीस अधिकारी.
4) पोलीस महानिरीक्षक.

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** — **योग्य पर्याय : 3**

- महाराष्ट्र पोलीस अधिनियम
- कलम 9 : पोलीस प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्यांची नेमणूक करणे.
  1) राज्य शासन किमान पोलीस अधीक्षक दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्यास नाशिक येथील पोलीस प्रशिक्षण महाविद्यालयाच्या प्राचार्य म्हणून नेमता येईल. राज्य शासनाकडून कार्ये, अधिकार, कर्तव्ये निश्चित केली जातील.
  2) राज्य शासन किमान सहाय्यक पोलीस अधीक्षक/उपअधीक्षक दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्यास प्रशिक्षण शाळेचा प्राचार्य म्हणून नेमता येईल.

**प्र.13. महाराष्ट्र पोलिस अधिनियम, 1951 मधील कलम 12(2) नुसार, असा प्रत्येक विभाग ............... च्या प्रभाराखाली असेल व असा प्रत्येक उप-विभाग हा पोलीस निरीक्षकाच्या प्रभाराखाली असेल. (PSI -2018)**

1) पोलीस उप-अधिक्षक
2) अपर आयुक्त
3) सहायक आयुक्त
4) सहायक पोलीस निरीक्षक

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** — **योग्य पर्याय : 3**

* महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम 1951
* कलम 12 : विभाग व उपविभाग यांची रचना.
1) राज्य शासनाच्या अधीन राहून पोलीस आयुक्त त्यास योग्य वाटल्यास त्याच्या प्रभाराखालील क्षेत्रात पोलीस विभाग पाडील व त्या विभागांचे उपविभाग पाडील.
2) विभागचा प्रभारी अधिकारी : सहाय्यक आयुक्त. उपविभागाच्या प्रभारी अधिकारी : पोलीस निरीक्षण.

**प्र.14. महाराष्ट्र पोलिस अधिनियम, 1951 च्या अंतर्गत उपहार गृह, परमीट रूम, बियर बार या ठिकाणी नृत्याविष्कारावर कोणत्या कलमांन्वये बंदी घालण्यात आली आहे ? (PSI -2018)**

1) कलम 33
2) कलम 32
3) कलम 30
4) कलम 33-A

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** — **योग्य पर्याय : 4**

- महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम 1951
- कलम 33 A : खाद्यपदार्थ, परमीटरूम/बिअरबार यांतील नृत्याविष्कारावर बंदी.

- 14 ऑगस्ट, 2005 रोजी समाविष्ट
- उल्लंघनास शिक्षा : 3 महिने ते 3 वर्षांपर्यंत कारावास व रु.50,000/- ते 2 लाखांपर्यंत द्रव्यदंड.
- तसेच खाद्यगृह परमीटरूम/बिअरबारचा परवाना निलंबित करून रद्द करता येईल. परवाना रद्द केल्याबद्दल 30 दिवसांच्या आत राज्य शासनाकडे अपील करता येईल. अपराध : दखलपात्र व अजामीनपत्र.

प्र.15. महाराष्ट्र पोलिस अधिनियम, 1951 कलम 34 अन्वये .............. व .............. यास आपआपल्या प्रभाराखाली असलेल्या क्षेत्रात, जेव्हा त्याच्या मते तशी कार्यवाही करणे आवश्यक असेल तेव्हा, त्यास योग्य वाटेल अशा पोलीस अधिकाऱ्यास कोणत्याही रस्त्यावर वाहने हाकण्याचे तात्पुरते बंद करण्याच्या प्रयोजनाकरीता अशा रस्त्यावर अडथळे उभारण्याचा अधिकार देता येईल. (PSI -2018)

1) जिल्हा दंडाधिकारी, उपविभागीय अधिकारी
2) आयुक्त, जिल्हा पोलीस अधिक्षक
3) सहायक आयुक्त, उपायुक्त
4) पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** योग्य पर्याय : 2

■ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम 1951
- कलम 34 : पोलीस आयुक्त व पोलीस अधिक्षक हे आपल्या क्षेत्रात त्यांना आवश्यक वाटल्यास रस्त्यावर (अडथळे उभारण्याची परवानगी देऊ शकतात.)

प्र.16. महाराष्ट्र पोलिस अधिनियम, 1951 मधील कोणते कलम जनतेसंबंधी पोलीस अधिकाऱ्यांच्या कर्तव्यांशी संबंधित आहे ? (PSI -2018)

1) कलम 66 2) कलम 64
3) कलम 65 4) कलम 67

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** योग्य पर्याय : 1

■ महाराष्ट्र पोलीस अधिनियम, 1951
- कलम 66 : लोकांसंबंधी पोलीस अधिकाऱ्याची कर्तव्ये
  i) अपंग-असहाय्य व्यक्तींना मदत करणे.
  ii) नशा चढलेल्या, वेड्या व्यक्तीला ताब्यात घेणे.
  iii) अटकेतील व्यक्तीस वैद्यकीय मदत, अन्न, आसरा देणे.
  iv) झडती घेताना विनाकारण त्रास देऊ नये.
  v) महिला, मुले यांच्याशी सभ्यतेने वागावे.
  vi) आगीपासून नुकसानीस प्रतिबंध करणे.
  vii) अपघात, संकट टाळण्यासाठी प्रयत्न करणे.

प्र.17. महाराष्ट्र पोलिस अधिनियम, 1951 च्या अंतर्गत दिलेल्या ''जागा'' या शब्दाच्या व्याख्येत खालीलपैकी कशाचा समावेश होत नाही ? (PSI -2018)

a) तंबू
b) तात्पुरता मंडप (बूथ)
c) तात्पुरते बांधकाम
d) खुले क्षेत्र (मोकळी जागा)

पर्यायी उत्तरे :
1) (c) फक्त
2) (c) आणि (d)
3) (a) आणि (b) फक्त.
4) वरीलपैकी सर्वांचा समावेश होतो.

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** योग्य पर्याय : 4

■ महाराष्ट्र पोलीस अधिनियम, 1951
- कलम 2(8) : जागा (व्याख्या)
- कायम/तात्पुरत्या स्वरूपाची इमारत, तंबू, मंडप, इमला, कुंपण घातलेली/खुले क्षेत्र.

प्र.18. महाराष्ट्र पोलिस अधिनियम, 1951 कलम 2(11) अन्वये ''पोलीस अधिकारी'' या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमान्वये नेमलेली किंवा नेमण्यात आली आहे असे समजण्यात येणारी पोलीस दलातील कोणतीही व्यक्ती असा होतो आणि यात कलम .............. किंवा .............. अन्वये नेमलेला विशेष पोलीस अधिकारी किंवा अपर पोलीस अधिकारी याचा समावेश होतो. (PSI -2018)

1) 19, 20 2) 21, 22
3) 23, 24 4) 25, 26

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** योग्य पर्याय : 2

■ महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951
- कलम 2(11) : पोलीस अधिकारी
- या अधिनियमांतर्गत नेमलेली किंवा नेमल्याचे समजले जाणारी कोणतीही व्यक्ती म्हणजे पोलीस अधिकारी.
- यामध्ये कलम 21 (विशेष पोलीस अधिकारी) कलम

22 (जादा पोलीस) नुसार नेमलेल्या विशेष पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश होतो.

**प्र.19. महाराष्ट्र पोलिस अधिनियम, 1951 च्या अंतर्गत पोलीस गणवेशाचा अनधिकृतपणे वापर केल्याबद्दल ............... पर्यंत द्रव्यदंडाची शिक्षा होईल. (PSI -2018)**

1) ₹5,000 2) ₹1000
3) ₹10,000 4) वरीलपैकी नाही.

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** योग्य पर्याय : 4

- **महाराष्ट्र पोलीस अधिनियम, 1951**
- **कलम 149** : पोलीस दलातील नसलेल्या व्यक्तीने पोलीसाच्या गणवेशाचा अनधिकृत वापर केल्याबद्दल. शिक्षा : ₹2,000/- पर्यंत दंड.

**प्र.20. खालीलपैकी कोणत्या बाबी पोलीसांची कायदेशीर कर्तव्ये नाहीत ? (PSI -2018)**

a) एखाद्या नशेतील व्यक्तीचा ताबा घेणे.
b) लोकांना निर्माण झालेला धोका टाळणे.
c) बालकल्याण निधीला योगदान देणे.
पर्यायी उत्तरे :
1) फक्त (a) 2) फक्त (c)
3) दोन्ही (a) आणि (c) 4) फक्त (b)

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** योग्य पर्याय : 2

- **महाराष्ट्र पोलीस अधिनियम, 1951**
- **कलम 66 : लोकांसंबंधी पोलीस अधिकाऱ्याची कर्तव्ये**
  1) अपंग-असहाय्य व्यक्तींना मदत करणे.
  2) नशेतील, धोकादायक व्यक्तींना, वेड्या व्यक्तीला ताब्यात घेणे.
  3) अटकेतील व्यक्तीस वैद्यकीय मदत, अन्न, आसरा देणे.
  4) झडती घेताना विनाकारण त्रास देऊ नये.
  5) आगीपासून नुकसानीस प्रतिबंध करणे.
  6) महिला, मुले यांच्याशी सभ्यतेने वागणे.
  7) अपघात, संकट टाळण्यासाठी प्रयत्न करणे.

**प्र.21. महाराष्ट्र पोलिस अधिनियम, 1951 मधील कलम .............. मध्ये आयुक्तांच्या अधिकारितेत सहाय्यक आयुक्त नेमण्याची तरतूद आहे. (PSI -2018)**

1) 10 2) 10A
3) 11 4) 12

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** योग्य पर्याय : 3

- **महाराष्ट्र पोलीस अधिनियम, 1951**
- **कलम 11** : पोलीस आयुक्तांच्या अधिकारितेत सहाय्यक आयुक्त नेमणे.
- **कलम 10** : आयुक्तांच्या हाताखालील उपायुक्त नेमणे.
- **कलम 12** : विभाग व उपविभाग यांची रचना.
- **कलम 12A** : पोलीस निरीक्षक.

**प्र.22. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, 1951 कलम 52(1) नुसार, जिल्हा दंडाधिकाऱ्याने (महसूल आयुक्तांच्या पूर्व मान्यतेने) कलम 51, पोट कलमे (............) ते (............) या अन्वये भरपाई दाखल वसूल केलेली सर्व रक्कम किंवा कोणताही पैसा, उपरोक्त हानी किंवा नुकसान झाल्याबद्दल किंवा मृत्युच्या किंवा जबर दुखापतीच्या संबंधाने ज्या व्यक्तींना भरपाई मिळण्याचा हक्क आहे, असे त्यास वाटत असेल अशा सर्व किंवा कोणत्याही व्यक्तींना देणे किंवा त्यांच्यात त्या रकमेची विभागणी करणे हे कायदेशीर असेल. (PSI -2018)**

1) 3, 8 2) 1, 9
3) 2, 10 4) 1, 8

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** योग्य पर्याय : 1

- **महाराष्ट्र पोलीस अधिनियम, 1951**
- **कलम 51 :** बेकायदेशीर जमावाने केलेल्या नुकसानीबद्दल भरपाई वसूल कशी करावी.
- **कलम 52(1) :** जिल्हा दंडाधिकाऱ्याने (महसूल आयुक्तांच्या पूर्व मान्यतेने) कलम 51, पोट कलमे (3) ते (8) या अन्वये भरपाई दाखल वसुल केलेली सर्व रक्कम किंवा कोणताही पैसा उपरोक्त हानी किंवा नुकसान झाल्याबद्दल किंवा मृत्युच्या किंवा जबर दुखापतीच्या संबंधाने ज्या व्यक्तींना भरपाई मिळण्याचा हक्क आहे असे त्यास वाटत असेल अशा सर्व किंवा कोणत्याही व्यक्तींना देणे किंवा त्यांच्यात त्या रकमेची विभागणी करणे कायदेशीर असेल.

**प्र.23. मुंबई पोलीस कायदा, 1951 च्या कलम 7 नुसार खालीलपैकी कोणते वाक्य चूक आहे? (PSI -2017)**

1) राज्य शासन आयुक्तांची नेमणूक करते.
2) आयुक्त आपली कार्ये, कर्तव्ये किंवा जबाबदाऱ्या महासंचालक व महानिरीक्षक यांच्या नियंत्रणास अधीन राहून वापरतात.

3) आयुक्त जिल्हा दंडाधिकारी किंवा अधीक्षकांच्या प्रभावाखाली असतात.

4) या कायद्यान्वये किंवा राज्य शासनाच्या निर्देशित केल्यानुसार आयुक्त अधिकाराचा वापर करतात.

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** — योग्य पर्याय : 3

■ **मुंबई पोलीस अधिनियम 1951**

* **कलम 7 : पोलीस आयुक्त.**

अ) राज्यशासनाला बृहन्मुंबई/राज्य शासनाने राजपत्रात करीता किंवा इतर कोणत्याही क्षेत्रासाठी एखाद्या पोलीस अधिकाऱ्यास पोलीस आयुक्त म्हणून नेमता येईल.

ब) तसेच उपरोक्त क्षेत्राकरीता एक/जास्त अप्पर आयुक्त व सहआयुक्त नेमता येईल.

क) आयुक्त आपली कार्ये, कर्तव्ये किंवा जबाबदाऱ्या महासंचालक व मद्यनिरीक्षक यांच्या नियंत्रणास अधीन करतील.

- पोलीस आयुक्त जिल्हा दंडाधिकारी किंवा अधीक्षकांच्या प्रभावाखाली असणार नाहीत.

**प्र.24. मुंबई पोलीस कायदा, 1951 नुसार जोड्या लावा.** **(PSI -2017)**

| कलम | तरतूद |
|---|---|
| अ) 103 | i) लोकांसमोर असभ्य वर्तन करणे. |
| ब) 105 | ii) पायवाट अडवणे |
| क) 110 | iii) रस्त्यावर किंवा रस्त्याजवळ किंवा सार्वजनिक जागी किंवा त्या जागेजवळ क्षोभक कृत्य करणे. |
| ड) 112 | iv) शांततेचा भंग व्हावा या उद्देशाने गैरवर्तन करणे. |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | ii | iii | i | iv |
| 2) | i | iii | iv | i |
| 3) | i | iv | iii | i |
| 4) | i | iv | i | iii |

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** — योग्य पर्याय : 1

■ **मुंबई पोलिस अधिनियम 1951**

| | |
|---|---|
| 1) कलम 103 | पायवाट अडवणे |
| 2) कलम 105 | रस्त्यावर किंवा रस्त्याजवळ किंवा त्या जागेजवळ क्षोभक कृत्य करणे. |
| 3) कलम 110 | लोकांसमोर असभ्य वर्तन करणे. |
| 4) कलम 112 | शांततेचा भंग व्हावा या उद्देशाने गैरवर्तन करणे. |
| - कलम 117 : | कलम 99 ते कलम 116 या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस अपराध सिद्धीनंतर 1200 रु.पर्यंत दंड होऊ शकेल. |

**प्र.25. मुंबई पोलीस अधिनियम, 1951 कलम 2 (11) अन्वये ''पोलीस अधिकारी' या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमान्वये नेमलेली किंवा नेमली असल्याचे समजण्यात येणारी पोलीस दलातील कोणतीही व्यक्ती असा होतो आणि तीत कलम .......... किंवा अन्वये नेमलेला विशेष पोलीस अधिकारी किंवा अपर पोलीस अधिकारी यांचा समावेश होतो.** **(PSI -2017)**

1) 24, 26
2) 21, 22
3) 22, 23
4) 24,25

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** — योग्य पर्याय : 2

■ **मुंबई पोलीस अधिनियम 1951**

- **कलम 2(11) : पोलीस अधिकारी.**
- या अधिनियमांतर्गत नेमलेला पोलीस दलातील कोणताही व्यक्ती.
- यामध्ये खालील व्यक्तींचा सुद्धा समावेश होतो.
- कलम 21 अंतर्गत विशेष पोलीस अधिकारी.
- कलम 22 अंतर्गत जादा पोलीस.

**प्र.26. मुंबई पोलीस अधिनियम, 1951 मधील कलम ............ नुसार प्रत्येक पोलीस अधिकारी सार्वजनिक जागेत प्रवेश झडती घेऊ शकतो.** **(PSI -2017)**

1) 67
2) 75
3) 65
4) 69

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** **योग्य पर्याय : 3**

■ मुंबई पोलीस अधिनियम 1951

- कलम 65 : लोकांच्या येण्या-जाण्याच्या ठिकाणी (सार्वजनिक ठिकाण, दारू, दुकाने, मादक पदार्थ विक्री ठिकाणी) अधिपत्राशिवाय (वॉरंट) पोलीसांना प्रवेश करता येईल.
- सद्भावनापूर्वक संशयित व्यक्तीची झडती घेण्याचा अधिकार.
- कलम 67 : रस्त्यावरील रहदारीचे नियमन करणे हे पोलीसांचे कर्तव्य.
- कलम 69 : कलम 68 चे उल्लंघन केल्यास पोलीसांचे अधिकार (कलम 68 : पोलीसांचे वाजवी आदेश पाळणे लोकांवर बंधनकारक)
- कलम 75 : ज्या व्यक्तीच्या ताफ्यातून प्राणी घेतला असेल त्याला हजर करण्याच्या अटीवर दंडाधिकारी प्राणी परत करू शकेल.

**प्र.27. मुंबई पोलीस कायदा, 1951 मध्ये कलम 33 अ की, जे खाद्यपदार्थ, परमीट रूम किंवा बिअर बार यांमधील नृत्याविष्कारावरील बंदी आणि परिणामरुप तरतुदीसाठी खालीलपैकी कोणत्या साली दुरुस्ती करुन समाविष्ट करण्यात आले? (PSI -2017)**

1) सन 2004 2) सन 2005
3) सन 2008 4) सन 2009

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** **योग्य पर्याय : 2**

■ मुंबई पोलीस अधिनियम 1951

- कलम 33(A) : खाद्यगृह, परमीटरूम/बिअरबार यातील नृत्यविष्कारास बंदी.
- दि.14 ऑगस्ट, 2005 रोजी या कायद्यात दुरुस्ती करून कलम 33(A) चा समावेश करण्यात आला.

**प्र.28. मुंबई पोलीस कायदा, 1951 मधील खालीलपैकी कोणत्या कलमानुसार भिकारी म्हणून घोषित केलेल्या विवक्षित व्यक्तिंना घालवून देण्याबाबतची तरतूद दिलेली आहे? (PSI -2017)**

1) 57 2) 57 (1) (अ) (2)
3) 57 (क) 4) 57 अ

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** **योग्य पर्याय : 4**

■ मुंबई पोलीस कायदा 1951

- कलम 57(अ) - भिकारी म्हणून घोषित केलेल्या व्यक्तींना घालवून देणे.
  अधिकार : पोलीस आयुक्त/जिल्हादंडाधिकारी.
- तत्पूर्वी अशा व्यक्तीला कोणत्याही उपक्रमात, सरकारी बांधकामावर नोकरीचा विकल्प देऊ केला जातो.
- कलम 58 नुसार असा आदेश अंमलात असण्याची मुदत कमाल 2 वर्षे असते.

**प्र.29. मुंबई पोलीस अधिनियमाअंतर्गत वरिष्ठ ते कनिष्ठ हुद्याप्रमाणे क्रम लावा : (PSI -2017)**

अ) पोलीस नाईक ब) पोलीस हवालदार
क) पोलीस जमादार ड) पोलीस शिपाई

**पर्यायी उत्तरे :**

1) ब, अ, क, ड 2) अ, ब, क, ड
3) क, ब, अ, ड 4) अ, क, ब, ड

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** **योग्य पर्याय : 3**

■ मुंबई पोलीस अधिनियम, 1951 नुसार वरिष्ठ ते कनिष्ठ क्रम-

पोलीस अधिक्षक
↓
अप्पर पोलीस अधिक्षक
↓
पोलीस उपअधीक्षक
↓
पोलीस निरीक्षक
↓
सहाय्यक पोलीस निरीक्षक
↓
पोलीस उपनिरीक्षक
↓
पोलीस जमादार
↓
पोलीस हवालदार
↓
पोलीस नाईक
↓
पोलीस शिपाई

**प्र.30. मुंबई पोलीस अधिनियम, 1951 मधील कलम 35 मध्ये केलेली तरतूद .......... संबंधित आहे. (PSI -2017)**

1) प्रेताचे दहन, दफन इतरत्र जागी करणे (प्रतिबंधित जागा सोडून) नियम करणे संबंधी
2) गायन- वादन, आवाज गोंगाट मनाई करणे.
3) रस्त्यावर अडथळे उभारणे, वाहतूक वाहने थांबविणे.
4) आयुक्त जिल्हा निरीक्षकांना व इतर अधिकाऱ्यास जनतेस आदेश देण्याचे अधिकार.

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** — **योग्य पर्याय : 1**

- **मुंबई पोलीस अधिनियम 1951**
- **कलम 35 :** राखून ठेवलेल्या जागेव्यतिरिक्त (स्मशानभूमी) इतर जागी प्रेतांची विल्हेवाट लावण्याची मनाई करण्याबाबत नियम करण्याचा अधिकार.
  अधिकार - सक्षम प्राधिकारी.
- **कलम 133 :** कलम 35 मधील नियमांचे उल्लंघन करण्यास शिक्षा.
- **शिक्षा :** 3 महिन्यांपर्यंत कारावास/रु.5,000/- दंड अथवा दोन्ही.

**प्र.31. मुंबई पोलीस अधिनियम, कलम, 1951 .............अन्वये शासनाला ज्या क्षेत्रात त्याच्या मते, असा बेकदायदेशीर जमाव जमला होता ते क्षेत्र (यात पुढे 'अशांत क्षेत्र' असे संबोधण्याचा) अधिकार आहे.**
**(PSI -2017)**

1) 51 (1) अ
2) 50
3) 51 (3)
4) 51 (1) (ब)

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** — **योग्य पर्याय : 1**

- **मुंबई पोलीस अधिनियम 1951**
- **कलम 51 (1) (अ) :** शासनाला ज्या क्षेत्रात त्याच्या मते असा बेकायदेशीर जमाव जमला होता ते क्षेत्र 'अशांत क्षेत्र' असे संबोधण्याचा अधिकार.
- **कलम 51 (1) (ब) :** जमावाने नुकसान भरपाई देण्यासाठी ठरवायचा दिनांक.
- **कलम 51 (3) :** नुकसान भरपाईची रक्कम जिल्हा दंडाधिकारी/मुख्य महानगर दंडाधिकारी ठरवितात (महसूल आयुक्ताच्या परवानगीने)
- **कलम 50 :** सार्वजनिक शांततेस विशेष धोका निर्माण झाला असता जादा पोलीस कामावर ठेवणे.
- अधिकार : राज्य शासन.

**प्र.32. मुंबई पोलिस अधिनियम, 1951 मधील कोणत्या कलमामध्ये रेल्वे पोलीसांची नेमणूक नमूद केली आहे?**
**(PSI -2017)**

1) 22-अ
2) 24
3) 21 ब
4) 23

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** — **योग्य पर्याय : 1**

- **मुंबई पोलीस अधिनियम कलम 1951**
- **कलम 22(A) :** रेल्वे पोलीसांची नेमणूक.
- राज्य शासनाला रेल्वेक्षेत्र समाविष्ट असलेले एक/विशेष पोलीस जिल्हे निर्माण करता येतील. प्रत्येक जिल्ह्यासाठी एक पोलीस अधिक्षक, एक/जास्त सहाय्यक अधीक्षक, उपअधीक्षक व इतर पोलीस अधिकारी नेमता येतील.
- **कलम 21 :** विशेष पोलीस अधिकारी
- **कलम 22 :** जादा पोलीसांची नेमणूक
- **कलम 23 :** पोलीस प्रशासनासाठी नियम तयार करण्याचा अधिकार.
- **कलम 24 :** महासंचालक, महानिरीक्षक किंवा आयुक्त यांना विवरणे मागविता येतील.

**प्र.33. मुंबई पोलीस अधिनियम, 1951 ......... येथे लागू होतो.**
**(PSI-2016)**

1) फक्त मुंबई
2) मुंबई उपनगरीय भाग
3) फक्त विदर्भ
4) संपूर्ण महाराष्ट्र राज्य

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** — **योग्य पर्याय : 4**

- **मुंबई पोलीस अधिनियम 1951**
- कलम 1 नुसार हा कायदा संपूर्ण महाराष्ट्रात लागू आहे.
- एकूण प्रकरणे : 8
- एकूण कलमे : 168
- अनुमती : 1 जून, 1951
- प्रसिद्धी : 11 जून, 1951
- 2011 साली नावात बदल : महाराष्ट्र पोलीस अधिनियम, 1951.

**प्र.34. महाराष्ट्रामध्ये सर्वोच्च पोलीस प्रशिक्षण संस्था कोठे आहे?**
**(PSI-2016)**

1) पुणे
2) लोणावळा
3) नागपूर
4) नाशिक

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** — **योग्य पर्याय : 4**

- महाराष्ट्रामध्ये सर्वोच्च पोलीस प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र पोलीस अॅकॅडमी ही (MPA-) ही नाशिक येथे आहे.
- ही संस्था ब्रिटिशांना 1906 मध्ये पोलीस ट्रेनिंग स्कूल (PTS) पुणे येथे स्थापन केलेली.
- 1908 मध्ये नाशिक येथे स्थलांतर.
- 1961 मध्ये या संस्थेची पुर्नरचना करून PTS चे पोलीस ट्रेनिंग कॉलेज (PTC) असे नामांतर.
- 5, फेब्रुवारी 1990 - नामांतर. महाराष्ट्र पोलीस अॅकॅडमी (MPA).
- 2006 रोजी' स्थापनेला 100 वर्षे पूर्ण.
- 2016 - स्वायत्त दर्जा.
- ISO 9001 : 2000 प्रमाणपत्र प्राप्त.

**प्र.35. मुंबई पोलीस अधिनियमातील कलम...... मध्ये, ज्या क्षेत्रातून व्यक्ती निघून जाण्याचा आदेश देण्यात आला आहे, त्या क्षेत्रात परत येण्याची तात्पुरती परवानगी देण्याची तरतूद आहे. (PSI-2016)**

1) 51 2) 64
3) 63 4) 65

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** योग्य पर्याय : 3

* **मुंबई पोलीस अधिनियम 1951**
* **कलम 63 :** ज्या क्षेत्रातून एखाद्या व्यक्तीस स्वत:हून निघून जाण्याचा आदेश दिला असेल त्या क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी/त्या क्षेत्रात परत येण्याची तात्पुरती परवानगी.
- परवानगी देण्याचा अधिकार - राज्य शासन/राज्य शासनाने प्राधिकृत केलेला अधिकारी.
- अशी परवानगी कोणत्याही वेळी रद्द केली जाऊ शकते.

**प्र.36. मुंबई पोलीस अधिनियमच्या कलम 66 मध्ये..... बाबत सांगितले आहे. (PSI-2016)**

1) पोलिसाने रस्त्यांवरील रहादारीचे नियमन करणे.
2) लोकांसबंधीची पोलीस अधिकाऱ्यांची कर्तव्ये.
3) लोकांच्या येण्याजाण्याच्या ठिकाणी प्रवेश करण्याचा अधिकार.
4) वरीलपैकी काहीही नाही.

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** योग्य पर्याय : 2

- **मुंबई पोलीस अधिनियम 1951**
- **कलम 64 :** पोलीस अधिकाऱ्यांची कर्तव्ये.
- **कलम 65 :** लोकांच्या येण्या-जाण्याच्या ठिकाणी वॉरंटशिवाय प्रवेश करण्याचा पोलीसांचा अधिकार.
- **कलम 66 :** लोकांसंबंधी पोलीस अधिकाऱ्यांची कर्तव्ये.
- **कलम 67 :** पोलीसांनी रस्त्यावरील रहदारी वगैरेचे नियमन करणे हे पोलीसांचे कर्तव्य.

**प्र.37. खालीलपैकी कोणता विषय मुंबई पोलीस अधिनियमातील पोलीस विनियम कलम 44 मध्ये समाविष्ट होतो? (PSI-2016)**

1) साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव रोखणे
2) मोकाट कुत्र्यांचा नाश करणे.
3) दंगाधोपा थांबवणे / थोपवणे
4) बंद इमारती व ठिकाणे

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** योग्य पर्याय : 2

- **मुंबई पोलीस अधिनियम 1951**
- **कलम 44 : मोकाट कुत्र्यांचा नाश करणे.**
- **आदेश** - आयुक्त/अधिक्षकाकडून.
- मोकाट कुत्री रस्त्यामध्ये/सार्वजनिक ठिकाणी सापडल्यास नाश केला जाईल.

**खालील परिस्थितीत कुत्र्याचा नाश करण्याचा विचार.**

1) 3 दिवस धरून ठेवल्यानंतर सुद्धा मुस्की घातली नाही तर.
2) तसेच झालेला खर्च दिला नाही तर.

- **खालील परिस्थितीत कुत्र्याचा नाश करता येत नाही.**

अ) गळ्यात मालकाच्या नावाचा पट्टा असल्यास (अपवाद-पिसाळलेला कुत्रा)

- खर्चाची वसुली Cr.Pc. प्रमाणे.
- **कलम 43 :** जत्रा इत्यादी ठिकाणी साथीचा रोगाचा प्रादुर्भाव न होण्यासाठी जिल्हा दंडाधिकाऱ्याला/आयुक्ताला उपाययोजना करण्याचा अधिकार.

**प्र.38. मुंबई पोलीस अधिनियमातील कलम......मध्ये जादा पोलिसांच्या खर्चाची व बेकायदेशीर जमावाने केलेल्या नुकसानीच्या भरपाईची प्रमाणशीर वसुली करणेबाबत तरतूद आहे? (PSI-2016)**

1) 53 2) 51
3) 54 4) 52

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** योग्य पर्याय : 3

- **मुंबई पोलीस अधिनियम 1951**
- **कलम 54 :** जादा पोलीसांच्या खर्चाची, बेकायदेशीर जमावाने

केलेल्या नुकसानीच्या भरपाईची प्रमाणशीर वसुली करणे.

- कलम 51 : बेकायदेशीर जमावाने केलेल्या नुकसानीबद्दल भरपाई कशी वसुल करायची.
- कलम 52 : कलम 51 नुसार दंडाधिकाऱ्याने भरपाई देणे किंवा तिची विभागणी करणे.
- कलम 53 : जिल्हाधिकाऱ्याचे कलम 51 व 52 ची कामे राज्य शासनाच्या अधीन राहून करावीत.

**प्र.39. मुंबई पोलीस अधिनियम कलम 17 अन्वये, कोणत्याही जिल्ह्याचा अधीक्षक व जिल्ह्यांचे पोलीस दलही...... नियंत्रणाखाली असतील. (PSI-2016)**

1) राज्य सरकार
2) जिल्हाधिकारी
3) गृह मंत्रालय
4) जिल्हा न्यायदंडाधिकारी

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** योग्य पर्याय : 4

- मुंबई पोलीस अधिनियम 1951
- कलम 17 : जिल्ह्यातील पोलीस बलावर जिल्हा दंडाधिकाऱ्याचे नियंत्रण असते.

**प्र.40. मुंबई पोलीस अधिनियम, कलम 2(11) अन्वये, ''पोलीस अधिकारी' या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमान्वये नेमलेली किंवा नेमली असल्याचे समजण्याज येणारी पोलीस दलातील कोणताही व्यक्ती असा होतो आणि तीत कलम ..... किंवा ..... अन्वये नेमलेला विशेष पोलीस अधिकारी किंवा अपर पोलीस अधिकारी यांचा समावेश होतो. (PSI 2017)**

1) 21,22
2) 20,21
3) 23,24
4) 22,24

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** योग्य पर्याय : 1

- मुंबई पोलीस अधिनियम 1951
- कलम 2(11) : पोलीस अधिकारी.
- या अधिनियमांतर्गत नेमलेला पोलीस दलातील कोणताही व्यक्ती.
- यामध्ये खालील व्यक्तींचा सुद्धा समावेश होतो.
- कलम 21 अंतर्गत विशेष पोलीस अधिकारी.
- कलम 22 अंतर्गत जादा पोलीस.

**प्र.41. मुंबई पोलीस अधिनियम, 1951 च्या कोणत्या प्रकरणात गुन्हा व शिक्षा या संदर्भात तरतूद केली आहे? (PSI-2016)**

1) प्रकरण तिसरे
2) प्रकरण चौथे
3) प्रकरण सहावे
4) प्रकरण सातवे

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** योग्य पर्याय : 4

- मुंबई पोलीस अधिनियम 1951
- मुंबई पोलीस अधिनियम् 1951 अंतर्गत प्रकरण खालील प्रमाणे

| प्रकरण क्रमांक | प्रकरणाचे नाव |
|---|---|
| 1 | प्रारंभिक |
| 2 | पोलीस दलाचे अधीक्षण, नियंत्रण आणि त्याचे संघटन |
| 2A | राज्य सुरक्षा आयोग, पोलीस आस्थापना मंडळे व पोलीस तक्रार प्राधिकरणे. |
| 3 | पोलीस दलाचे विनिमय करणे, त्यावर नियंत्रण ठेवणे, त्यास शिस्त राखणे. |
| 4 | पोलीस विनियम. |
| 5 | सार्वजनिक सुव्यवस्था व राज्याची सुरक्षितता राखण्यासाठी विशेष उपायोजना. |
| 6 | पोलीसांचे कार्यकारी अधिकार व कर्तव्ये |
| 7 | अपराध व शिक्षा |
| 8 | संकीर्ण |

**प्र.42. सार्वजनिक ठिकाणी रहदारीच्या नियमनासाठी व सुव्यवस्था राखण्यासाठी नियम करण्याचा अधिकार...... यांना प्रदान केला आहे. (PSI-2016)**

1) आयुक्त
2) पोलीस उपअधिक्षक
3) पोलीस निरीक्षक
4) पोलीस उपनिरीक्षक

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** योग्य पर्याय : 1

- मुंबई पोलीस अधिनियम 1951
- कलम 33 :सार्वजनिक ठिकाण इ. मध्ये रहदारीच्या नियमांची व सुव्यवस्थेसाठी नियम तयार करण्याचा अधिकार.

अ) पोलीस आयुक्त
ब) पोलीस अधीक्षक
क) जिल्हा दंडाधिकारी

**प्र.43. मुंबई पोलिस अधिनियम अंतर्गत खालीलपैकी कोणाविरुद्ध तडीपारीचा आदेश काढता येतो ? (PSI-2016)**

अ) समाजाविघातक कृत्ये करून अशांतता पसरवू शकेल अशी व्यक्ती.

ब) वारंवार शांती-मोर्चे काढून वाहतूकीस अडथळा आणणाऱ्या व्यक्ती.
क) विहीत वेळेनंतर ध्वनीक्षेपकावर गाणी लावणाऱ्या व्यक्ती.
ड) साथीचा रोग झालेली व्यक्ती जिच्या वास्तव्यामुळे रोग पसरून लोकांच्या आरोग्यास बाधा येऊ शकेल.

पर्यायी उत्तरे :

1) अ आणि क
2) ब, क आणि ड
3) अ आणि ड
4) वरीलपैकी सर्व

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** योग्य पर्याय : 3

■ **मुंबई पोलीस अधिनियम 1951**

- **कलम 56 :** अपराध करण्याच्या बेतात असणाऱ्या व्यक्तींना घालवून देणे.
- **अधिकार :** पोलीस आयुक्त, जिल्हा दंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी पुढील व्यक्तींना असा आदेश देण्यात येईल.
  - i) व्यक्तीच्या हालचाली/कृत्ये यामुळे व्यक्तीस/मालमत्तेस भय, धोका/निर्माण करतात/करण्याची शक्यता आहे.
  - ii) IPC मधील प्रकरण 12, 16, 17 मधील अपराध करणारी/करण्याच्या बेतात असलेली/त्यास अपप्रेरणा देणारी व अशा व्यक्तीच्या विरुद्ध साक्षीदार पुढे येण्यास तयार नाहीत.
  - iii) सार्वजनिक सुव्यवस्था व सार्वजनिक पुरवठ्यास बाधा आणणाऱ्या गुन्ह्यासंदर्भात व्यक्ती.
  - iv) बाहेरून आलेली व्यक्ती सतत राहिल्याने साथीच्या रोगाचा उद्भव होण्याची शक्यता.
- **कलम 57 :** विशिष्ट अपराधाबद्दल सिद्ध अपराध व्यक्तींना घालवून देणे.
- खालील कायद्यांतर्गत गुन्हा केलेल्या व्यक्ती पुन्हा गुन्हा करण्याची शक्यता असल्यास अशा व्यक्तींना घालवून देण्याचा अधिकार पोलीसांना असतो.

1) मुंबई दारूबंदी अधिनियम
2) मुंबई जुगार प्रतिबंध अधिनियम
3) सीमा शुल्क अधिनियम
4) रेल्वे मालमत्ता अधिनियम.
5) IPC (प्रकरण 12, 16, 17)
6) मुंबई पोलीस अधिनियम कलम 122 व 124 अंतर्गत 3 किंवा अधिक वेळा गुन्हा केल्यास.

---

**प्र.44. मुंबई पोलीस अधिनियम 1951, अंतर्गत खालीलपैकी कोणत्या सार्वजनिक जागेसाठी, परवाना घेण्याची गरज नाही?** (PSI 2014)

1) भोजन वसतिगृह
2) उपाहारगृह
3) मदिरागृह
4) निवासगृह

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** योग्य पर्याय : 2

■ **मुंबई पोलीस अधिनियम, 1951**

- **कलम (2) (5) (A) - खाद्यगृह**
- ज्या ठिकाणी लोकांना खाद्यपदार्थ व पेय पुरवले जाते.
- त्यात, अल्पोपहार कक्ष, उपहारगृह, कॉफीगृह, खाण्यापिण्याकरीता खाद्यपदार्थ/पेय पुरविण्यात येणारे दुकान यांचा समावेश होतो.
- परंतु यात सार्वजनिक करमणुकीच्या जागेचा समावेश होत नाही.
- यामुळे वरील पर्यायांमधील उपहारगृह सोडून इतर जागेसाठी परवाना घेण्याची आवश्यकता असते.

---

**प्र.45. मुंबई पोलीस अधिनियम 1951 चे कलम 37 नुसार आयुक्त आणि जिल्हा दंडाधिकारी यांना सार्वजनिक शांतता आणि सुरक्षितता राखण्याकरिता खालीलपैकी कोणता अधिकार दिला गेलेला नाही?** (PSI 2014)

अ) शस्त्रे, तलवारी, भाले, बंदुका, सुरे, काठ्या इ. वस्तु बरोबर घेवून जाण्यास मनाई करणे.
ब) कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेण्यास प्रतिबंध करणे.
क) दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे जवळ बाळगण्यास किंवा ते सोडण्यास किंवा फेकण्यास प्रतिबंध करणे.
ड) कोणत्याही सार्वजनिक जागेत किंवा जागेजवळ ध्वनिक्षेपकाचा उपयोग करण्याचे नियम करणे व त्यावर नियंत्रण ठेवणे.

1) अ फक्त
2) अ आणि ब फक्त
3) क फक्त
4) ड फक्त

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** योग्य पर्याय : 4

■ **मुंबई पोलीस अधिनियम, 1951**

- **कलम 37 :** अव्यवस्थेला प्रतिबंध करण्यासाठी ठराविक कृतींना मनाई करण्याचा अधिकार पोलीस आयुक्त व जिल्हा दंडाधिकाऱ्यांना असतो.

**1) खालील बाबींना मनाई करता येते.**

अ) शस्त्रे/इजा करता येण्यासारखी वस्तू सोबत नेणे.

पदार्थ बरोबर नेणे.
ब) दाहक/स्फोटक पदार्थ बरोबर नेणे.
क) दगड/क्षेपणास्त्रे फेकण्याची उपकरणे बाळगणे-जमा करणे, तयार करणे.
ड) प्रेते-आकृत्या-प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे.
इ) 'जाहीर घोषणा- गाणी- वाद्य वाजविणे.
फ) प्रक्षोभक भाषणे- चित्रे, चिन्हे, फलक तयार करणे- प्रसार करणे.

- **कलम 37(2) :** उल्लंघन केलेल्या वस्तू जमा करता येतील.
- **कलम 37(3) :** ही मनाई 15 दिवसांपर्यंत असेल (मुदतवाढ देण्यासाठी राज्यशासनाची परवानगी आवश्यक)
- **कलम 38 :** आवाज, गोंगाट होणारे गायन, वादन, व्यवसाय चालू ठेवण्यास मनाई करण्याचा अधिकार.

1) अधिकार पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक.

**प्र.46. जमावाने बेकायदेशीररीत्या केलेल्या जबर दुखापतीची नुकसान भरपाई कोण ठरवते? (PSI 2014)**

अ) ग्रेटर मुंबईत मुख्य महानगर दंडाधिकारी
ब) जिल्ह्यात जिल्हा दंडाधिकारी
क) महसूल आयुक्ताच्या पूर्व मंजुरीने (अ) व (ब) दोन्ही पर्याय
ड) प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी
योग्य पर्याय निवडा.

1) अ व ब 2) ब फक्त
3) क फक्त 4) अ आणि ड

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** योग्य पर्याय : 3

■ **मुंबई पोलीस अधिनियम 1951**
- **कलम 51 :** बेकायदेशीर जमावाने केलेल्या नुकसानीबद्दल नुकसानी वसूल करायची.
- नुकसान भरपाईची रक्कम जिल्हादंडाधिकारी/मुख्य महानगरदंडाधिकारी निश्चित करतात.
- त्या क्षेत्रातील रहिवाशांकडून कराच्या रूपाने रक्कम वसूल करून त्यातून नुकसान भरपाई दिली जाते.

**प्र.47 मुंबई पोलीस अधिनियम 1951 च्या कलम 55, 56, 57 आणि 57 (अ) अनुसार एखाद्या विशिष्ट जागेवर न जाण्याच्या आदेशाची मुदत अवधी कोणत्याही परिस्थितीमध्ये .....पेक्षा जास्त राहू शकत नाही. (PSI 2014)**

1) 6 महिने 2) 1 वर्ष
3) दीड वर्ष 4) दोन वर्ष

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** योग्य पर्याय : 4

■ **मुंबई पोलीस अधिनियम 1951**
- **कलम 55 :** व्यक्तीच्या टोळ्या व जमाव यांची पांगापांग करणे.
- **कलम 56 :** अपराध करण्याच्या बेतात असणाऱ्या व्यक्तींना घालवून देणे.
- **कलम 57 :** विशिष्ट अपराधाबद्दल सिद्ध अपराध व्यक्तींना घालवून देणे.
- **कलम 57(A) :** भिकारी म्हणून घोषित केलेल्या व्यक्तींना घालवून देणे.
- **कलम 58 :** कलम 55, 56, 57, 57(A) मधील आदेश अंमलात असण्याची मुदत जास्तीत जास्त 2 वर्षे असते.

**प्र.48. 'पोलीस अधिकाऱ्यांच्या जनतेप्रती जबाबदाऱ्या' मुंबई पोलीस अधिनियम 1951 च्या कोणत्या कलमामध्ये नमूद केल्या आहेत? (PSI 2014)**

1) 64 2) 65
3) 66 4) यापैकी कोणतेही नाही

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** योग्य पर्याय : 3

■ **मुंबई पोलीस अधिनियम 1951**
- **कलम 66 :** पोलीस अधिकाऱ्याची कर्तव्ये

1) अपंगास साह्य.
2) नशा चढलेला, वेडा व्यक्तीस ताब्यात घेणे.
3) अटक केलेल्या व्यक्तीस वैद्यकीय मदत, अन्य आसरा देणे.
4) झडती घेताना विनाकारण त्रास देऊ नये, उद्धटपणा करू नये.
5) आगीपासून नुकसानीस प्रतिबंध करणे.
6) स्त्री, मुले यांच्याबाबतीत नीतिनियमांचे पालन करणे.
7) अपघात, संकट टाळणे.

**प्र.49. मुंबई पोलीस अधिनियम 1951 च्या कलम 64 नुसार खालीलपैकी कोणते पोलीस अधिकाऱ्यांचे कर्तव्य नाही? (PSI 2014)**

1) अटक केलेल्या किंवा अभिरक्षेत ठेवलेल्या कोणत्याही व्यक्तीला योग्य अन्न व निवारा देण्याबद्दल व्यवस्था करणे.
2) प्रत्येक समन्स तत्परतेने बजावणे व प्रत्येक अधिपत्र किंवा इतर आदेश तत्परतेने पाळणे व बजावणे.

3) आपणास शक्य असेल तितका प्रयत्न करुन सार्वजनिक उपद्रव निर्माण होण्यास आळा घालणे.
4) दुसरा कोणताही पोलीस अधिकारी मदतीस बोलावील तेव्हा त्यास मदत करणे.

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** — योग्य पर्याय : 1

- **मुंबई पोलीस अधिनियम 1951**
- **कलम 64 :** पोलीस अधिकाऱ्याचे कर्तव्य (एकूण 6 आहेत.)

1) समन्स तत्परतेने बजावणे व वरिष्ठांचे आदेशांचे पालन करणे.
2) दखलपात्र गुन्ह्यात तत्परतेने कार्य करणे.
3) सार्वजनिक उपद्रवास प्रतिबंध करणे.
4) अटक करणे.
5) दुसरा पोलीस अधिकारी मदतीस बोलावतील तेव्हा त्यास मदत करणे.
6) अंमलात असलेल्या कायद्यानुसार सोपविण्यात आलेली कर्तव्ये पार पाडणे.

- **कलम 66 :** लोकांसंबंधी पोलीस अधिकाऱ्यांची कर्तव्ये, यामध्ये अटकेतील व्यक्तीच्या आरोग्याची काळजी घेणे व अटकेतील व्यक्तीची अन्न, आसरा यांची व्यवस्था करणे यांचा समावेश होतो.

**प्र.50. मुंबई पोलीस अधिनियम 1951 च्या कलम 67 नुसार रस्त्यातील रहदारी वगैरेचे नियमन करणेबाबत खालीलपैकी कोणते पोलीस अधिकाऱ्यांचे कर्तव्य नाही?(PSI 2014)**

1) रस्त्यातील रहदारीचे नियमन करणे व रहदारीवर नियंत्रण ठेवणे.
2) रस्त्यात बंदोबस्त ठेवणे.
3) सार्वजनिक तरीतमध्ये (प्रवाशी बोट वाहतुक) लोकांची फार गर्दी होवू न देणे.
4) आगीमुळे हानी किंवा नुकसान न होऊ देण्याबद्दल प्रयत्नांची शिकस्त करणे.

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** — योग्य पर्याय : 4

- **मुंबई पोलीस अधिनियम 1951**
- **कलम 67 :** पोलीसाने रस्त्यावरील रहदारी वगैरेचे नियमन करणे.

1) रस्त्यावरील रहदारीवर नियंत्रण.
2) रस्ते, जत्रा, सार्वजनिक पूजास्थान, स्नानाच्या, धुण्याच्या व उतरण्याच्या जागा इ. ठिकाणी बंदोबस्त ठेवणे.
3) होडी इ. ठिकाणच्या गर्दीचे नियमन करणे.

**प्र.51. मुंबई पोलीस अधिनियम 1951 च्या कोणत्या कलमा अंतर्गत रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी स्वतःचे अंग प्रदर्षण करणे प्रतिषेध आहे? (PSI 2014)**

1) 110 2) 111
3) 112 4) 113

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** — योग्य पर्याय : 1

- **मुंबई पोलीस अधिनियम 1951**
- **कलम 110 : लोकांसमोर असभ्य वर्तन करणे.**
- हेतूपूर्वक शरीर उघडे टाकू नये, सार्वजनिक ठिकाणी असभ्य भाषा वापरू नये; असभ्य रीतीने/दांडगाईने/गैरशिस्तीने वागू नये.
- **कलम 117 : शिक्षा. अपराधसिद्धीनंतर रु.1200/- पर्यंत द्रव्यदंड.**

**प्र.52. बॉम्बे पोलीस कायदा, 1951 कुठे लागू होतो? (PSI 2013)**

1) बॉम्बे
2) महाराष्ट्र
3) महाराष्ट्र आणि गोवा
4) महाराष्ट्र आणि गुजरात

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** — योग्य पर्याय : 2

- **बॉम्बे पोलीस कायदा - 1951**
- **कलम 1 :** संक्षिप्त नाव, व्यक्ती व प्रारंभ

1) या कायद्यास महाराष्ट्र पोलीस कायदा, 1951 असे म्हणावे.
2) हा कायदा संपूर्ण महाराष्ट्रात लागू आहे.

- सदर कायद्याचे नाव महाराष्ट्र (विवक्षित मुंबई कायद्याच्या संक्षिप्त नावात बदल) अधिनियम 2011 नुसार मुंबई पोलीस अधिनियम, 1951 हे महाराष्ट्र पोलीस अधिनियम, 1951 असे बदलण्यात आले.

**प्र.53. जर एखाद्या व्यक्तिला पोलीस अधिकाऱ्याने त्रास देण्याकरिता किंवा अनावश्यकरित्या अडवले, तपासले किंवा अटक केले, तर गुन्हा सिध्द झाल्यास त्या पोलीस अधिकाऱ्याला जास्तीत-जास्त किती काळासाठी कारावास होऊ शकतो? (PSI 2014)**

1) 3 महिने 2) 6 महिने
3) 9 महिने 4) 1 वर्ष

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** — पर्याय - 2

■ मुंबई पोलीस अधिनियम 1951

▸ कलम 147 : पोलीस अधिकाऱ्याने तापदायक रीतीने प्रवेश केल्यास किंवा झडती घेणे किंवा अटक करणे.

1) अधिकार नसताना/वाजवी कारण नसताना जागेत प्रवेश करून झडती.

2) मालमत्ता त्रासदायक रीतीने व विनाकारण जप्त करणे.

3) विनाकारण व त्रासदायक रीतीने अटकावून ठेवणे, झडती, अटक करणे.

4) अटकेतील व्यक्तीवर विनाकारण शारीरिक अत्याचार करणे.

▸ शिक्षा : 6 महिन्यांपर्यंत कारावास/रु.500/- पर्यंत दंड अथवा दोन्ही.

**प्र.54. जर एखादी व्यक्ती पोलीस दलामध्ये नसताना सुद्धा, अनाधिकृतपणे पोलीस गणवेशाचा वापर करत असेल तर गुन्हा सिध्द झाल्यास त्याला जास्तीत जास्त किती दंड होऊ शकतो? (PSI 2014)**

1) रु. 1000
2) रु. 2000
3) रु. 5000
4) यापैकी कोणतेही नाही

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** — योग्य पर्याय : 2

■ मुंबई पोलीस अधिनियम 1951

■ कलम 149(A) : पोलीस दलातील नसलेल्या व्यक्तीने पोलीसाच्या गणवेशाचा अनधिकृतपणे वापर केल्याबद्दल शिक्षा.

शिक्षा : रु.2000/- पर्यंत दंड.

**प्र.55. खालीलपैकी कोणती बाब/विषय बॉम्बे पोलीस अधिनियम, 1951 या कायद्या अन्वये हाताळला गेला नाही? (PSI 2013)**

1) पोलीस दलाचे अधीक्षण, नियंत्रण आणि त्याची संघटना
2) पोलीस दलाचे विनियमन, नियंत्रण ठेंवणे व त्यांच्यात शिस्त राखणे.
3) मानवी शरीराविरोधी अपराध
4) सार्वजनिक सुव्यवस्था व राज्याची सुरक्षितता राखण्यासाठी विशेष उपाययोजना

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** — योग्य पर्याय : 3

■ महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951

▸ प्रकरण 2 : पोलीस दलाचे अधिक्षण व नियंत्रण आणि त्यांचे संघटन.

▸ प्रकरण 3 व 4 : पोलीस दलाचे विनियमन करणे, त्यावर नियंत्रण ठेवणे व त्यांच्यात शिस्त राखणे आणि पोलीस विनियम.

▸ प्रकरण 5 : सार्वजनिक सुव्यवस्था व राज्याची सुरक्षितता राखण्यासाठी विशेष उपाययोजना.

■ भारतीय दंड संहिता (IPC) 1860 अंतर्गत

▸ प्रकरण 16 : मानवी शरीरास बाधक होणाऱ्या अपराधांविषयी जीवितास बाधक होणाऱ्या अपराधांविषयी कलम 299 ते कलम 377.

**प्र.56. बॉम्बे पोलीस कायदा, 1951 नुसार खालीलपैकी कोणते कृत्य हे गुन्हा नाही? (PSI 2013)**

1) 14 वर्षापेक्षा जास्त वयाचा दिसत नसेल अशा मुलाकडून तारण घेणे.
2) खेळांमध्ये फसविणे.
3) रस्त्यावर जुगार खेळणे.
4) एखाद्या व्यक्तीने गुरांना कोंडवाड्यात घालणे.

**विश्लेषणासह स्पष्टीकरण** — योग्य पर्याय : 4

■ मुंबई पोलीस अधिनियम 1951

▸ कलम 89 : पोलीसांना मोकाट गुरे ताब्यात घेण्याचा अधिकार आहे तसेच त्यांना कोंडवाड्यात नेण्याचा अधिकार आहे.

▸ कलम 90(A) : गुरेढोरे रस्त्यावर भटकून देणे किंवा सार्वजनिक मालमत्तेवर अतिक्रमण करू देण्यास शिक्षा.

▸ कलम 128 : 14 वर्षांपेक्षा जास्त वयाचा दिसत नसलेल्या मुलाकडून तरण घेणे, एखादी वस्तू विकत घेणे (मालकांच्या परवानगीशिवाय) तसेच अशा मुलास तारणावर पैसे देणे.

शिक्षा : रु.2000/- पर्यंत दंड.

▸ कलम 130 : खेळामध्ये फसवणूक.

▸ जो कोणी पत्त्यांचा व इतर खेळ खेळण्यामध्ये कपट करून किंवा बेकायदेशीररीत्या युक्तीने कोणतीही मौल्यवान वस्तू किंवा पैसे जिंकेल त्याला IPC च्या कलम 415 (ठकवणूक) प्रमाणे फसवणूक केल्याप्रकरणी शिक्षा देण्यात येईल.

▸ कलम 130(A) : रस्त्यावर जुगार खेळणे.

शिक्षा : रु.2500/- पर्यंत दंड.

**प्र.57. मुंबई पोलीस अधिनियम, 1951 च्या अंतर्गत 'गुरेढोरे' च्या व्याख्येमध्ये कोणत्या प्राण्याचा समावेश नाही?'' (PSI 2013)**